मा जिल्हा/१०/२०


पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम ता.जि.वाशिम
कार्यालय दुरध्वनी क्र. ०७२५२-२३४८३४
ई-मेल आयडी :- sp.washim@mahapolice.gov.in
Website : www.washimpolice.gov.in


**क्रमांक :-** पोअवा/पशा-४/अनुकंपा -लिपीक/नियुक्ती-/२०२४ 10385 वाशिम दिनांक :- 8 OCT 2024

## आदेश

संदर्भ :- १. शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१.०९.२०१७.
२. शा.नि.सा.प्र.वि.क्र.अकंपा-१२१९/प्र.क्र.५६/आठ, दिनांक ११.०९.२०१९.
३. मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,अ.प.अ.यांचे आदेश क्र.अप/कक्ष-२/अनुकंपा/बिंदू वाटप/२०२४/१६६६६, दिनांक १४.०८.२०२४.

००००००

पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम या आस्थापनेवरील लिपीक टंकलेखक यांची रिक्त पदे अनुकंपा तत्वावर भरण्यासाठी सन २०२४ मध्ये आयोजित केलेल्या गठीत निवड समितीने खालील नमूद उमेदवार हे अनुकंपाचे ज्येष्ठतेनुसार लिपीक टंकलेखक या पदावर निवड होण्यास पात्र असल्याची मान्यता दिल्याने व जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रुग्णालय वाशिम यांनी सदर उमेदवारांना वैद्यकीय तपासणीमध्ये शारिरीकदृष्टया योग्य ठरविले आहे. तसेच चारित्र पडताळणीमध्ये पात्र आढळून आल्याने त्यांची पोलीस अधीक्षक वाशिम यांचे आस्थापनेवर रिक्त असलेल्या कनिष्ठ श्रेणी लिपीक टंकलेखक या तृतीय श्रेणी पदावर वेतनस्तर एस-०६ : १९९००-६३२०० या सुधारीत वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तरावर व त्यावर नियमानुसार वेळोवेळी अनुज्ञेय भत्यावर अस्थाई तत्वावर हजर झाल्याचे दिनांकापासून खालील अटींच्या आधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अनुकंपाधारकाचे नाव | जात/प्रवर्ग | नियुक्ती प्रवर्ग | कर्मचा-यांचे नियुक्तीचे पद | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ |
| १ | कु. सायली दिलीप वाघ | मराठा | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपीक | पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम |

**अटी व शर्ती :-**

१. आपली नियुक्ती अस्थाई व तात्पुरत्या स्वरुपाची असून आपण कर्तव्यावरुन अनधिकृतरित्या किंवा वरिष्ठांची पूर्व परवानगी शिवाय कर्तव्यावर गैरहजर राहील्यास अथवा बेशिस्तपणाचे वर्तन केल्याचे आढळून आल्यास आपणास कोणतीही पूर्व सुचना न देता नोकरीतून कमी करण्यात येईल.

२. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अनियो/१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ अन्वये ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासकीय सेवेत नियुक्ती होणा-या उमेदवारांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू टरेल.मात्र, सद्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम,१९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही.

३. आपण पुर्व चारीत्र्य व वर्तणुक पडताळणीबाबत भरुन दिलेल्या साक्षांकन नमुन्यामध्ये खोटी माहीती पुरविली आहे किंवा वस्तुस्थितीदर्शक माहीती दडवून ठेवल्याचे आपले सेवाकाळात निर्दशनास आल्यास, आपण सेवा समाप्त होण्यास पात्र ठराल व आपले पदाची सेवा कोणतीही पूर्व सुचना न देता समाप्त (Terminate) करण्यात येईल आणि आपण कायदेशीर कार्यवाहीस पात्र ठराल.

४. नियुक्ती स्विकारल्यानंतर ज्या उमेदवारांना त्यांचे पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर तशी लेखी सुचना एक महीना आगाऊ नियुक्ती कार्यालयास द्यावी लागेल. अन्यथा त्यांना मिळत असलेल्या एक महीन्याच्या मुळ वेतनाऐवढी रक्कम शासन कोषागारात भरणा करणे बंधनकारक राहील.

५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक.वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११ मंत्रालय, मुंबई दिनांक ०२ जुन २०१४ च्या अनुषंगाने आपल्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन महीन्याच्या कालावधीत स्वत:ची मत्ता व दायित्व याबद्दलची विवरणपत्रे कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

६. ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे. अशा उमेदवारास नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ०६ महीन्याच्या आत जात तपासणी वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागेल. अन्यथा आपली सेवा समाप्त करण्यात येईल

७. शासन निर्णय क्रमांक.अनुकंपा/१०९५/प्र.क्र.३४/अ/८, दिनांक २०.०८.१९९६ च्या तरतुदीनुसार त्यांना इंग्रजी टंकलेखक ४० शब्द व मराठी ३० शब्द प्रतिमिनिट प्रमाणपत्र दोन वर्षाचे आत सादर करणे आवश्यक आहे. सादर न केल्यास सेवा समाप्त करण्यात येईल

८. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च २००३ नुसार महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT ही संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून ०२ वर्षाचे आत स्वखर्चाने प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

९. तुम्हास कोणतीही खातेबाहय परिक्षा द्यावयाची असल्यास त्या परिक्षेस बसण्यासाठी अर्ज करण्यापूर्वी या कर्यालयाची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

१०. मराठी भाषा व हिंदी भाषा १०० गुणांचा विषय घेवून माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण नसल्यास एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण करावी लागेल.

११. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ च्या अमलबजावणी नुसार शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७१/२००० बारा दिनांक २८.०३.२००५ अन्वये आपण

दिनांक २८ मार्च २००५ रोजी किंवा त्यानंतर हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र नमुना अ(नियम ४) भरुन दिले आहे. भविष्यात आपले आपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक आढळून आल्यास आपण शासकीय सेवेत अपात्र ठरविण्यात येवून आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

१२. आपणास महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक आणि शिस्त व अपील नियम १९७९ व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम व अटी लागू होतील.

१३. आपली नियुक्ती ही पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे आस्थापनेवर करण्यात आली असली तरीही आपली बदली परिक्षेत्रातंर्गत तसेच परिक्षेत्राबाहेर वरिष्ठांचे आदेशानुसार बदली करण्याचे अधिकार समक्ष प्राधिका-यास आहेत. त्याप्रमाणे त्यांना बदलीच्या ठिकाणी कर्तव्यार्थ जाणे बंधनकारक राहील.

१४. नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

१५. सदर आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत रुजू होणे बंधनकारक राहील. अन्यथा त्या उमेदवाराचा नियुक्तीबाबतचा हक्क रद्द समजण्यात येवून हे आदेश आपोआपच रद्द होतील.

(अनुज तारे)
**पोलीस अधीक्षक, वाशिम**

प्रति,

कु. सायली दिलीप वाघ,रा.गोवर्धन ता.रिसोड मु.लाखाळा,वाशिम

**प्रत,**

अपर पोलीस अधीक्षक/पोलीस उप अधीक्षक (मुख्या)/कार्यालय अधीक्षक/जिल्हा पोलीस प्रसिध्दी पत्रक/लघुलेखक/ आस्थापना शाखा, प्रमुख लिपीक/लेखाशाखा प्रमुख लिपीक/ पत्रव्यवहार शाखा, प्रमुख लिपीक/वि.चौ.शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.

**प्रत माहीतीस्तव सविनय सादर :-**

मा.पोलीस उप महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
मा.जिल्हाधिकारी, वाशिम